जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JUN 2024
सकाळ

# 'एम. ए. पर्यटन' प्रवेश प्रक्रिया विद्यापीठात सुरू

कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागामध्ये दक्षिण महाराष्ट्रात प्रथमच एम. ए. प्रवास आणि पर्यटन अभ्यासक्रम सुरू झाला आहे. या अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत मंगळवार (ता. २५) पर्यंत आहे.

एम. ए. प्रवास आणि पर्यटन हा दोन वर्षांचा पूर्णवेळ अभ्यासक्रम आहे. तो अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर नोकरी करता येते.

विद्यार्थी स्वतःचा व्यवसायही सुरू करू शकतो. विद्यार्थ्याला विद्यापीठाची पदवी मिळणार असल्याने करिअरच्या अनेक संधी त्याला मिळणार आहेत, असे अभ्यासक्रम समन्वयक डॉ. मीना पोतदार यांनी कळविले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 4 JUN 2024
लोकमत

# विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे जर्मन भाषा परीक्षेत यश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातील 'जर्मन भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमा'चे दहा विद्यार्थी नुकतेच ग्योथे इन्स्टिट्यूट (मॅक्स म्युलर भवन) या संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या 'स्टार्ट डॉइश ए-वन' या आंतरराष्ट्रीय जर्मन भाषा परीक्षेत उत्तीर्ण झाले. यामध्ये प्रेरणा शिर्के, मृणाल कुलकर्णी, सिद्धराज माने, अनिरुद्ध पाटील, विश्वजित पाटील, सुजाता सरनाईक, नीकिता पागवे, योगेश कांबळे, साक्षी पाटील, हर्षवर्धन माने या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

विभागात इतर विदेशी भाषांबरोबरच 'जर्मन भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम' चालवला जातो. या अभ्यासक्रमाचा दर्जा आंतरराष्ट्रीय स्तरावरील अभ्यासक्रमाच्या बरोबरीचा आहे. विद्यार्थ्यांच्या या यशात विदेशी भाषा विभागातील जर्मन भाषा शिक्षिका श्रद्धा खवरे यांचे मोठे योगदान आहे. आंतरराष्ट्रीय जर्मन भाषा परीक्षेतील यशाबद्दल विदेशी भाषा विभागाच्या विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातील विविध अभ्यासक्रमांचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JUN 2024
सकाळ



इचलकरंजी : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ड्रॅगन बोट स्पर्धेतील रौप्यपदकप्राप्त नाईट कॉलेजच्या खेळाडूंच्या सत्कारप्रसंगी राहुल खंजिरे, प्राचार्य नारे.

# नाईट कॉलेजच्या खेळाडूंचे राष्ट्रीय ड्रॅगन बोट स्पर्धेत यश

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. २३ : येथील येथील देशभक्त बाबासाहेब भाऊसाहेब खंजिरे शिक्षण संस्थेच्या नाईट कॉलेजच्या खेळाडूंनी राष्ट्रीय ड्रॅगन बोट स्पर्धेत नेत्रदीपक यश मिळवले. खेळाडू अभय कुचेकर (बी. ए. भाग दोन) व कुमार मिठारी (बी. ए. भाग तीन) यांनी अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ड्रॅगन बोट स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले आणि रौप्यपदक पटकावले.

स्पर्धा पंजाब विद्यापीठ चंदीगड येथे झाल्या. स्पर्धेत संपूर्ण भारतातील १०४ विद्यापीठांच्या संघांनी सहभाग घेतला होता. यामध्ये शिवाजी विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व करत कुचेकर व मिठारी यांनी यश मिळवले. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय स्पर्धेत दोन्ही खेळाडूंचा इचलकरंजी इंडस्ट्रियल इस्टेटचे अध्यक्ष व संस्थेचे संचालक राहुल खंजिरे, प्राचार्य डॉ. पी. डी. नारे यांनी सत्कार केला.